सी.एच.एम.ई.सोसायटी संचालित

# बालक मंदिर ५वी ते ७वी मराठी माध्यम

## शालेय उपक्रम २०२३-२४


**************

एकूण विद्यार्थी संख्या – ३७४

शिक्षक संख्या – १५

शिक्षकेतर कर्मचारी संख्या – ३

## सांस्कृतिक उपक्रम

| | |
|---|---|
| **आषाढी एकादशी**<br>आषाढी एकादशी निमित्त विद्यार्थ्यांची दिंडी काढण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांनी संतांची वेशभूषा करून त्यांचे स्वगत सादर केले. |  |
| **दीप अमावस्या**<br>विद्यार्थ्यांना आपल्या जीवनातील दिव्याचे महत्व सांगितले. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या प्रकारचे दिवे तयार केले व दिव्यांचे चित्र काढले. |  |
| **गोकुळाष्टमी**<br>विद्यार्थ्यांमध्ये सांघिक भावना निर्माण होण्याच्या उद्देशाने गोकुळाष्टमीचे आयोजन केले. |  |
| **मराठी दिन**<br>मराठी साहित्याची ओळख व साहित्यिकांचे<br>स्वगत, कविता, नाटिका, भारुड यांचे सादरीकरण करण्यात आले. |  |

| | |
|---|---|
| **शिवजयंती**<br><br>विद्यार्थ्यांनी शिवरायांवर आधारित गाणी, नाटिका, पोवाडे सादर केले. |  |
| **गुरुपौर्णिमा**<br>गुरुपौर्णिमेनिमित्त आपल्या शाळेची माजी विद्यार्थिनी व तिचे गुरु यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. |  |

# शैक्षणिक उपक्रम

| | |
|---|---|
| **नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत**<br>शाळेचा परिसर दाखवून शाळेच्या आवारातील कोंदंडधारी रामाच्या दर्शनाने नवीन वर्षाची सुरुवात. विद्येची देवता गणपती व सरस्वती यांची वेशभूषा करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. |  |
| **विज्ञान दिन**<br>श्रद्धा व अंधश्रद्धा यांतील फरक सांगून अंधश्रद्धा निर्मुलनासंदर्भात प्रात्याक्षिकांचे सादरीकरण. प्रत्येक गोष्टीत विज्ञान कसे दडले आहे ते उदाहरण व प्रयोगाद्वारे स्पष्ट केले. |  |
| **शालेय निवडणूक**<br>लोकशाही पद्धतीने निवडणूक कशी होते हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे समजले. शालेय मंत्रीमंडळाची स्थापना करण्यात आली. |  |
| **क्रीडामहोत्सव**<br>विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना व खिलाडूवृत्ती निर्माण करणे. शारीरिक व्यायामासाठी गोळाफेक, दोरी उड्या, थाळीफेक तसेच पालकांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. |  |
| **चित्रकला स्पर्धा** - संस्थेचे संस्थापक डॉ. मुंजे जयंतीनिमित्त चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.<br>विषय :-<br>• मुंजे यांच्या जीवनावर आधारित प्रसंग.<br>• युद्धातील एक प्रसंग<br>• आर्मी, एअरफोर्स, नेव्ही यावर आधारित चित्र |  |

| | |
|---|---|
| ट्रेकिंग<br>विद्यार्थ्यांच्या साहसीवृतीला चालना मिळणे, यासाठी अंजनेरी, नाणेघाट, मुल्हेर येथे ट्रेकिंगसाठी नेण्यात आले. |  |
| शाडूमातीचा गणपती बनविणे<br>**(पर्यावरणपूरक उपक्रम)**<br>विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळणे यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी स्वत: शाडू मातीचा गणपती बनवून त्याची प्रतिष्ठापना केली. |  |
| शिक्षकदिन<br>विद्यार्थ्यांना अध्यापनाचा अनुभव मिळणे.<br>शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करणे, यासाठी विद्यार्थ्यांनी १ली ते ७वी विद्यार्थ्यांना शिकविण्याचा अनुभव घेतला. |  |
| गणित- विज्ञान प्रदर्शन<br>विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर व्हावी तसेच वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट होणे. |  |
| क्षेत्रभेट – शालेय अभ्यासक्रमाचे दृढीकरण होण्यासाठी व पर्यावरणाची सजकता निर्माण होण्यासाठी दिलेली भेट.<br>५वी सा.वा.ना. संग्रहालय – जुन्या काळातील धातूच्या वस्तू, मूर्ती, शस्त्र, पुस्तके या वस्तू पाहिल्या.<br>६वी निर्मलग्राम – खत तयार करणे, लगद्यापासून वस्तू तयार करणे. बायोगॅस तयार करणे. कचऱ्यापासून वस्तू तयार करणे. |  <br>, |

# सामाजिक उपक्रम

| | |
|---|---|
| **माता पालक मेळावा – हळदी कुंकू**<br>माता पालकांसाठी आहार व आरोग्य याविषयावर सौ. वैशाली गोसावी यांचे व्याख्यान. त्यात त्यांनी विद्यार्थ्यानीच्या आरोग्याविषयी माहिती PPT द्वारे स्पष्ट केली. |  |
| **संत गाडगेबाबा पुण्यतिथी**<br>समाजात स्वच्छतेचा प्रसार व प्रचार व्हावा म्हणून पथनाट्य गोदाघाटावर सादर करण्यात आले. पथनाट्य लेखन शिक्षकांनी केले होते. |  |
| **रक्षाबंधन**<br>समाजातील विविध स्तरावरील लोक जसे पोलीस, स्वच्छता कर्मचारी, शेतकरी, बँकेचे कर्मचारी यांना राखी बांधून कृतज्ञता व्यक्त केली. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या सीमेवरील सैनिकांना पाठविण्यात आल्या. |   |
| **पालकांसाठी व्याख्यान**<br>प्रमुख अतिथी – मा. गुंजन कुलकर्णी<br>विषय :- सकारात्मक पालकत्व<br>विद्यार्थ्यांची जडण-घडण योग्य होण्यासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. |  |
| डॉ.अतुल कणिकर यांच्या विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी आजच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत असणाऱ्या समस्येवर समुपदेशन करण्याच्या हेतूने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. |  |

# रामोत्सव

| | |
|---|---|
| दि. १६ जानेवारी २०२४<br>१६ जानेवारी ते २२ जानेवारी दरम्यान रोज शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना कथा सांगितल्या. अयोध्या ते लंका हा श्रीरामांच्या वनवासाचा मार्ग, त्याचे भौगोलिक स्थान, नकाशा पीपीटीद्वारे विद्यार्थ्यांना दाखवून माहिती सांगितली. |  |
| दि. १७/०१/२४<br>**रंगभरण स्पर्धा** – धनुर्धारी राम, रामायणावर आधारित प्रसंग रंगवणे. |  |
| दि. १८ जानेवारी २०२४<br>रामाच्या गीत गायनाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्यात विद्यार्थी, शिक्षक, पालक यांचा समावेश होता. |  |
| दि. २० जानेवारी २०२४<br>विद्यार्थ्यांची शोभायात्रा काढण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांनी राम, सीता, लक्ष्मण, हनुमान, वानरसेना यांची वेशभूषा केली होती. राम मंदिरात रामरक्षा पठण करण्यात आले. |  |
| रामोत्सावाअंतर्गत रामायण एक-चिंतन या कार्यक्रमात चित्रकला शिक्षिका सौ. सुनयना आंबेकर साकारलेली रांगोळी. |  |
| १९ जानेवारी २०२४ व २१ जानेवारी २०२४<br>रामाचे गुण कळावे यासाठी, त्यावर आधारित विद्यार्थ्यांसाठी व पालकांसाठी प्रश्नमंजुषा घेण्यात आली. | |

# बालसभा

| | |
|---|---|
| एखाद्या कार्यक्रमच नियोजन कसे करावे, त्यातील बारकावे कोणते, याचा अनुभव देण्यासाठी बालसभेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना कामकाजाचे आयोजन, नियोजन समजणे. त्यांचा सभाधीटपणा वाढीस लागणे. त्यांच्यातील अनेक गुण विकसित करणे हा उद्देश असून तो पूर्ण झाला. यासभेत शिक्षक दिन, हिंदी, दिन, मराठी दिन, व्यसनांचे परिणाम असे विषय घेण्यात आले. |  |

# अभिव्यक्ती

## दर शनिवारी दप्तरविरहित शाळा अभिव्यक्ती अंतर्गत घेतले जाणारे उपक्रम

| | |
|---|---|
| **बागकाम** –विद्यार्थ्यांनी स्वत: जमिनीची मशागत करून, बियाणांची पेरणी केली. त्याला रोज पाणी देऊन त्याची निगा राखली, आणि आलेल्या भाज्यांची विद्यार्थ्यांनी विक्री केली. |  |
| **पाककला** – तिळाचे लाडू, गाजराची कोशिंबीर, कुरमुरे भेळ, शेंगदाण्याचे लाडू, बिस्कीट बॉल विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केले. आणि त्याचा उपयोग ते घरीदेखील करू लागले. |  |
| **व्यावसायिक-** मेणबत्या तयार करून विद्यार्थ्यांनी त्याची विक्री केली. तसेच कागदी पिशव्या देखील तयार केल्या. |  |
| **झांज व लेझीम** – पायाची लयबद्धता विकसित होऊन विद्यार्थी एकजुटीने झांज व लेझीम सादर करतात. |  |
| **भरतकाम** – आजच्या विद्यार्थ्यांना सुई –दोरा कसा वापरावा हे समजवण्यासाठी हा उपक्रम घेण्यात येतो. |  |
| **गायन** – गणनायकाय गण देवताय, सणांवर आधारित, देशभक्तीपर गीत, पोवाडा .इ गाणी शिकविण्यात आली. |  |
| **चित्रकला** – वारली पेंटिंग, मंडला आर्ट, बेसिक शेप कसे काढावे हे विद्यार्थ्यांना शिकविण्यात येते. |  |
| **कथाकथन** – वक्तृत्व कसे करावे, आवाजातील चढ उतार, कथा कशी कथन करावी, हे  विद्यार्थ्यांना सांगितले जाते. |  |